दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९८ । शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## कापूरवाडी, वारूळवाडीत १३ लाख ब्रास अवैध उत्खनन

### ॲड. अभिषेक भगत यांची उच्चस्तरीय चौकशी व कारवाईची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील मौजे कापूरवाडी व वारूळवाडी परिसरातील डोंगर-टेकड्यांवर तब्बल १३ लाख ब्रासपेक्षा अधिक अवैध गौण खनिज उत्खनन झाल्याची बाब भूमी अभिलेख विभागाच्या मोजणी अहवालातून उघडकीस आली आहे. याप्रकरणी जबाबदार अधिकारी व भू-माफियांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अर्जदार ॲड. अभिषेक विजय भगत यांनी महसूल मंत्री, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ॲड. भगत यांनी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजीच या गैरप्रकाराबाबत ई-मेलद्वारे तक्रार केली होती. त्यानंतर विविध वृत्तपत्रांनी बातम्या प्रसिद्ध करून प्रशासकीय निष्क्रियतेवर प्रकाश टाकला. नुकतीच विधानमंडळ अंदाज समितीने प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून या बेकायदेशीर उत्खननाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, जिल्हा प्रशासनाकडून खुलासे मागवले आहेत. कौटुंबिक व सार्वजनिक महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान, नैसर्गिक पर्यावरणाचा विनाश आणि प्रशासकीय संगनमताची शक्यता लक्षात घेता, या संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (एसीबी) स्वतंत्र व वेळबद्ध चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## सभापतींच्या घरी रंगला कौटुंबिक रक्षाबंधन सोहळा

**पुणे–** विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या निवासस्थानी आज शुक्रवारी (२८ ऑगस्ट) कौटुंबिक रक्षाबंधन सोहळा रंगला. यानिमित्ताने आप्तस्वकियांची मांदियाळी जमली होती. कौटुंबिक गप्पाष्टक व हास्य-विनोद यावेळी रंगले. सभापती प्रा. शिंदे यांना तीन बहिणी आहेत. त्यांचे कुटुंबीय आज रक्षा बंधन सोहळ्यानिमित्त प्रा. शिंदे यांच्या निवासस्थानी आले होते.



थोरली बहीण सौ. साखरबाई आजीनाथ भांड (रा.पोथरे, ता.करमाळा), मधली बहीण सौ. शोभा गणपत देवडे (रा.निर निमगाव, ता.इंदापूर) व धाकटी बहीण सौ.शहाबाई रवींद्र भांड (रा.पोथरे ता.करमाळा) यांनी प्रा. शिंदे यांना औक्षण करून राखी बांधली.

यावेळी प्रा. शिंदे यांच्या मातुःश्री श्रीमती भामाबाई शंकरराव शिंदे व अन्य कुटुंबीय उपस्थित होते. विधानपरिषदेच्या सभापती पदासारख्या अतिमहत्वाच्या पदावर काम करतानाच, आपल्या व्यस्त कार्यक्रमातून आपली रक्ताची नाती जपण्याचे काम सभापती प्रा. राम शिंदे यांनी कौटुबीक रक्षाबंधन सोहळ्यात उत्साहाने सहभागी होत केले. यानिमित्ताने त्यांनी राज्यभरातील लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाच्या शुभेच्छाही दिल्या. दरम्यान विधानपरिषद सभापती ना. प्रा राम शिंदे यांचे चिरंजीव अजिंक्य व मुलगी डॉ. अन्विता यांनी रक्षाबंधन सण साजरा केला.

## कुणबी प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेत सुसूत्रता आणा - ना. विखे पाटील

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर–** कुणबी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणून ती सुलभ, पारदर्शक व गतिमान करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. विद्यार्थ्यांच्या प्रकरणांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींवर करावयाच्या कार्यवाहीबाबत स्मार्ट सिटी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह आठही जिल्ह्यांतील जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे उपविभागीय अधिकारी व संबंधित अधिकारी सहभागी झाले.

डॉ. विखे पाटील यांनी सांगितले की, कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत उपलब्ध नोंदी व कागदपत्रांच्या आधारे संबंधित व्यक्तीची वंशावळ तसेच सादर केलेल्या पुराव्यांची सुसंगती स्पष्टपणे तपासावी. महसुली कागदपत्रे, शैक्षणिक पुरावे तसेच इतर उपलब्ध अभिलेखांच्या आधारे वंशावळ निश्चित करण्याची कार्यवाही सुसूत्रपणे करावी. नागरिकांकडून नियमानुसार आवश्यक तीच कागदपत्रे मागवून प्रक्रिया सुलभ ठेवावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

वंशावळ निश्चित करताना मोडी लिपीतील नोंदी, जुन्या अभिलेखांमधील नोंदी, आडनाव नसलेल्या अभिलेखांबाबत तसेच स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा बैठकीत आढावा घेण्यात आला. मोडी लिपीतील नोंदींचे तज्ज्ञांकडून भाषांतर करून घेण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. इतर जिल्ह्यांमध्ये किंवा शेजारील गावांमध्ये संबंधित नोंदी उपलब्ध असल्यास तेथील अभिलेखांचा संदर्भ घेऊन वंशावळ व नातेसंबंधाची खातरजमा करण्याची कार्यपद्धती स्पष्ट ठेवावी, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत अधिक समन्वय ठेवण्याबाबतही त्यांनी सूचना दिल्या. उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तपासण्यात आलेली संबंधित कागदपत्रे जात वैधता समितीला उपलब्ध करून देत दोन्ही प्रक्रियांमध्ये अधिक समन्वय साधावा. ऑनलाइन प्रक्रियेचा प्रभावी वापर करून नागरिकांना वेळेत सेवा मिळेल, यासाठी कार्यपद्धती अधिक सुलभ करावी. विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरांच्या माध्यमातून

■ पान ४ वर

## सोनई व बेलवंडीत पाच गुटखा विक्रेत्यांवर छापे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने सोनई (ता. नेवासा) आणि बेलवंडी (ता. श्रीगोंदा) पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुटखा व मावा विक्रेत्यांवर ५ ठिकाणी छापे टाकून ८९ हजार ३६६ रुपये किमतीचा सुगंधीत तंबाखू, मावा व पानमसाला जप्त केला. या प्रकरणी ८ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली निळकंठ कारखेले, अतुल लोटके, विकास साळवे, सतीष भवर यांच्यासह कर्मचाऱ्यांची दोन पथके तयार करून कारवाईसाठी रवाना करण्यात आली. दिनांक २७ ऑगस्ट रोजी एलसीबीच्या या पथकांनी सोनई व बेलवंडी हद्दीत छुप्या रीतीने चालणाऱ्या गुटखा विक्रीची माहिती काढून एकाच वेळी ५ ठिकाणी छापे टाकले.

सोनई येथे २ गुन्हे दाखल करण्यात आले. शब्बीर महेताब सय्यद (वय ४५) व जावेद उस्मान शेख (वय ५२) अशी आरोपींची नावे आहेत. बेलवंडी हद्दीत ३ गुन्हे नोंदवण्यात आले. यात सोमनाथ उर्फ गणेश घोरपडे, विजय चोरडिया आणि जाकीर इसाक शेख यांच्यावर कारवाई करून मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत संकेत पाचपुते, कमलेश कृपालीनी आणि फयाज तांबोळी हे तीन आरोपी फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

## सोशल मीडियावर महिलेची बदनामी करून उकळली पाच लाखांची खंडणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जुन्या वादातून एका महिलेची व तिच्या कुटुंबाची सोशल मीडियावर बदनामी करत, मुलाला मारण्याची धमकी देऊन ५ लाख रुपयांची खंडणी उकळल्या प्रकरणी महिलेच्या फिर्यादीवरून आरोपी किशोर महादेव परभणे (रा. बांदखेल, ता. आष्टी, जि. बीड) याच्याविरुद्ध काळेवाडी (पुणे) पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिलेने आरोपीविरुद्ध यापूर्वीही आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला होता.

जून २०२६ मध्ये जामिनावर सुटल्यानंतर आरोपीने पिंपरी कोर्ट परिसरात महिलेचा फोटो काढून धमकी दिली. तसेच, कौटुंबिक बदनामीची व मुलाला जिवे मारण्याची भीती दाखवून तक्रारदारांकडून ५ लाख रुपये उकळले. आरोपीने इंस्टाग्राम व फेसबुकवरील सुमारे १४ बनावट आयडीवरून महिला व तिच्या पतीच्या फोटोंमध्ये छेडछाड करत अश्लील व बदनामीकारक मजकूर व्हायरल केला. मुलीच्या बनावट आयडीद्वारे कुटुंबाची माहिती मिळवून नातेवाइकांचीही फसवणूक केली.

■ पान ४ वर




## ८३४ विद्यार्थ्यांच्या हातून साकारल्या हजारो ‘समर्थ राख्या’; जवानांच्या मनगटासाठी देशभक्तीचा प्रेमधागा!

### टपाल विभाग व श्री समर्थ प्रशालेचा अनोखा देशभक्तीपर उपक्रम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सीमेवर देशाचे रक्षण करताना आपल्या कुटुंबापासून दूर राहणाऱ्या भारतीय सैनिकांच्या मनगटावर रक्षाबंधनाच्या दिवशी प्रेम, कृतज्ञता आणि देशभक्तीचा धागा बांधण्यासाठी सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेतील ८३४ विद्यार्थ्यांनी अनोखा संकल्प साकारला. भारतीय टपाल विभागाच्या उत्तर उपविभाग, सहाय्यक अधीक्षक कार्यालय, अहिल्यानगर व समर्थ प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने ‘एक समर्थ राखी भारतीय सैनिकांसाठी’ हा भावस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला.

प्रशालेतील ८३४ विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने हजारो ‘समर्थ राख्या’ तयार करून त्या भारतीय जवानांसाठी ‘आम्ही आपल्या सोबत आहोत’ हा संदेश देत विद्यार्थ्यांनी सैनिकांप्रती असलेला आदर, अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त केली.

प्राचार्या सौ. वसुधा जोशी यांच्या पर्यावरणपूरक ‘समर्थ राखी’ संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी कागद, पुठ्ठा, लाकूड, लोकर, दोरा यांसह विविध पर्यावरणपूरक साहित्याचा वापर केला. आरसे, मणी, टिकल्या, रंगीत दगड, तिरंगी ध्वज, बिया, कडधान्य, कापूस

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### जिव्हेश्वर सांस्कृतिक भवन येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन




अहिल्यानगर -आपले आरोग्य... आमची जबाबदारी या संकल्पनेतून स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळ, अहिल्यानगर, साईदीप सह्याद्री हॉस्पिटल्स आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बागडपट्टी येथील जिव्हेश्वर सांस्कृतिक भवन येथे रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरात मोफत सुविधा -सर्वसाधारण आरोग्य सल्ला, महिला आरोग्य तज्ञांचे मार्गदर्शन,रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी,ईसीजी तपासणी,एक्स-रे तपासणी, रक्त तपासणी,आरोग्य समुपदेशन व सर्वसाधारण औषधे मोफत मिळतील.या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा.असे आवाहन स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी श्री. नीरज चांगटे मो.नं.८३२९०६५६२९ यांच्याशी संपर्क साधावा.

### अरणगावातील अवैध धंद्यांविरोधात कारवाईची मागणी

अहिल्यानगर - अरणगाव (ता. नगर) हद्दीत सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर व अवैध धंद्यांमुळे गावातील तरुण पिढीचे भवितव्य धोक्यात आले असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावातील अवैध धंदे समूळ नष्ट करून तरुणाईला व्यसनाच्या विळख्यातून वाचवावे, या मागणीसाठी ग्रामस्थ दिलीप कांबळे यांनी ग्रामसभेत निवेदन दिले. प्रशासन तसेच स्थानिक सत्ताधाऱ्यांनी या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. अरणगाव परिसरात अवैध दारू विक्री, जुगार तसेच अन्य बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याने त्याचा थेट परिणाम गावातील सामाजिक वातावरणावर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः युवा वर्ग या गैरप्रकारांच्या आहारी जाण्याची शक्यता वाढल्याने पालक आणि ग्रामस्थांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. अवैध धंद्यांना वेळीच आळा घातला नाही, तर त्याचे दूरगामी परिणाम गावाच्या सामाजिक आणि कौटुंबिक व्यवस्थेवर होऊ शकतात, अशी भीती कांबळे यांनी व्यक्त केली. अवैध धंद्यांमुळे अरणगावातील शांततापूर्ण वातावरण धोक्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाच्या विकासासाठी आणि तरुणांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रशासनाने अशा गैरप्रकारांविरोधात ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कारवाई होणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हंटले आहे. गावातील वाढता रोष आणि संताप लक्षात घेऊन सरपंच व ग्राम अधिकाऱ्यांनी अवैध धंद्यांच्या प्रश्नावर लवकरच 'विशेष ग्रामसभा' बोलावण्याचे आश्वासन दिले आहे. अवैध दारू आणि जुगाराच्या विळख्यात अरणगावचे भविष्य असणारी तरुण पिढी अडकत असल्याचा गंभीर आरोप दिलीप कांबळे यांनी केला. प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप करून हे प्रकार बंद केले नाहीत, तर परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. ''प्रशासन कारवाई करणार की गावकऱ्यांना कायदा हातात घ्यावा लागणार?'' असा संतप्त सवाल कांबळे यांनी उपस्थित केला.

### हजरत मोहम्मद पैगंबर यांचे ऐतिहासिक पवित्र केस दर्शनास खुले

अहिल्यानगर - मोहंमद पैगंबर यांची जयंती ईद मिलादुन्नबी (झेंडा ईद) म्हणून बुधवारी दि.२६ ऑगस्ट रोजी सर्वत्र उत्साहात साजरी झाली. या निमित्त सालाबाद प्रमाणे शहरातील टकटी दरवाजा (मीर मुर्तूजा टकटी दरवाजा महल) येथे मोहंमद पैगंबर यांचे पवित्र केस (हजरत बाल) भाविकांच्या दर्शनासाठी खुले केले आहेत. तसेच यावेळी विविध धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या पवित्र केसाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.येथील पुजारी सय्यद बुर्हाण कादरी चिश्ती यांनी सांगितले की, देशात ७ ते ८ ठिकाणी मोहम्मद पैगंबर यांचे पवित्र केस दर्शनासाठी उपलब्ध असतात या ठिकाणांमध्ये आपल्या अहमदनगरचा समावेश आहे. अहमदनगरचा जो जुना मुघल कालीन इतिहास आहे त्या इतिहासात हजरत मोहम्मद पैगंबर यांचे पवित्र केसाचा उल्लेख केलेला आहे. ज्याचा पुरावा पुजारी सय्यद बुरान कादरी चिस्ती यांच्या जवळ उपलब्ध आहे.नगरला परंपरेनुसार दरवर्षी फक्त हजरत मोहंमद पैगंबर यांच्या जयंती दिनीच पवित्र केस दर्शनासाठी खुले करण्यात येतात.

# नेवाशात फलविक्रेत्यांच्या अतिक्रमणावरून झालेला वाद पोलिसांच्या सतर्कतेने शांत

## पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**नेवासे शहर –** नेवासे शहरातील फलविक्रेत्यांनी केलेल्या अतिक्रमणाच्या मुद्द्यावरून गुरुवारी (ता. २७) दुपारी मोठा तणाव निर्माण झाला होता. दोन गटांमध्ये तुफान राडा होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची गंभीर परिस्थिती उद्भवली होती. परंतु, नेवासे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी दाखवलेले प्रसंगावधान, अचूक नियोजन आणि कर्तव्यदक्षतेमुळे कायदा व सुव्यवस्था पूर्ववत झाली असून शहरात शांतता प्रस्थापित झाली आहे.

**नेमकी काय घडली घटना?**

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी सुमारे १ वाजेच्या सुमारास एका स्थानिक नेत्याने संत ज्ञानेश्वर मंदिराकडे जाणारा मुख्य रस्ता भाविकांसाठी खुला करावा, या मागणीचे निवेदन नगरपंचायत प्रशासनाला दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत नगरपंचायत प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस यांच्या मदतीने खोलेश्वर गणपती मंदिर चौक ते नगरपंचायत परिसरातील रस्त्यावरील फळविक्रेत्यांना ठरवून दिलेल्या जागेवर स्थलांतरित होण्याच्या सूचना देण्यास सुरुवात केली. प्रशासनाकडून ही कारवाई सुरू असतानाच, दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास संबंधित नेते भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे आपल्या वाहनातून घरी परतत होते. खोलेश्वर गणपती चौकाजवळ त्यांचे वाहन येताच संतप्त जमावाने त्यांच्या खासगी वाहनावर जोरदार दगडफेक करत वाहनाची तोडफोड केली. या हल्ल्यात वाहनाच्या पुढील व मागील काचा फुटल्यामुळे परिसरात एकच घबराट व गोंधळ उडाला होता.

पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांची धाव आणि प्रसंगावधान घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या पोलीस ताफ्यासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

जमावाला रोखले: प्रताप दराडे यांनी अत्यंत कौशल्याने व धैर्याने परिस्थिती हाताळत आक्रमक जमावाला शांत केले आणि दोन्ही बाजूंना पांगवले.

वाहनाला सुरक्षित बाहेर काढले: दगडफेक होत असलेल्या ठिकाणावरून पोलिसांच्या मदतीने ते वाहन सुरक्षितपणे पुढे काढून दिले.

संशयितांना ताब्यात घेतले: घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ चौकशी सुरू करत काही जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

**वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून घटनास्थळाची पाहणी**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्यासह शेवगाव उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू आणि श्रीरामपूर उपविभागीय अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला व पोलीस प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या.

**पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे आवाहन**

''फळविक्रेत्यांच्या प्रकरणाबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही जणांना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करू नयेत; अन्यथा संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांची गय केली जाणार नाही.''

प्रताप दराडे, पोलीस निरीक्षक, नेवासे

**तालुकाभरातून कौतुक आणि आभार**

पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी वेळेवर धाव घेऊन ही परिस्थिती नियंत्रणात आणली नसती, तर दोन्ही गटांत मोठा राडा होऊन शहराची शांतता भंग झाली असती. कोणीही कायदा हातात न घेता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहिल्याने नेवासा शहर पुन्हा एकदा भीतीमुक्त वातावरणात सुरू आहे. प्रताप दराडे यांच्या या अचूक नियोजनामुळे आणि कर्तव्यदक्षतेमुळे मोठा अनर्थ टळल्याने नेवासे शहरासह संपूर्ण तालुक्यातून त्यांचे विशेष कौतुक होत असून नागरिकांकडून मनःपूर्वक आभार मानले जात आहेत.

# एमआयडीसी पैठण पोलिसांचे 'ऑल आऊट ऑपरेशन'; सात जणांवर कारवाई, ९ वाहतूक केसेस

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** एमआयडीसी पैठण पोलिसांनी २४ ऑगस्ट रोजी राबविलेल्या 'ऑल आऊट ऑपरेशन'मध्ये विविध गुन्ह्यांप्रकरणी सात आरोपींवर कारवाई केली. यामध्ये अवैध दारू विक्री, सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणे, शाळेच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रस्त्याच्या मधोमध वाहन उभे करून वाहतुकीस व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन आरडाओरड करून शांतता भंग करणाऱ्या एकावर कारवाई करण्यात आली. बेकायदेशीर विक्रीच्या उद्देशाने १ हजार २०० रुपये किमतीच्या १२ देशी दारूच्या बाटल्या बाळगणाऱ्या व्यक्तीवरही गुन्हा दाखल करण्यात आला. शाळेपासून १०० मीटरच्या आत तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या तीन जणांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत अनुक्रमे १५०, २०० आणि ४१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवरही पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली. विना हेल्मेट वाहन चालविणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर, सीट बेल्ट न लावणे, अतिरिक्त प्रवासी वाहतूक तसेच पोलिसांच्या मॅन्युअल सिग्नलचे उल्लंघन अशा प्रकरणांत एकूण ९ वाहतूक केसेस करण्यात आल्या. या कारवाईत ७ हजार १०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. एमआयडीसी पैठण चे पोलीस उपनिरीक्षक भारत मोरे यांच्या धडक कारवाईमुळे नियमभंग करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, आगामी काळातही अशा प्रकारच्या कारवाया सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद**

# रक्तदान हेच खरे जीवनदान – डॉ.विलास मढीकर

## सामाजिक बांधिलकी जपत जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचा उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्यात जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानने पुढाकार घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन केले ही कौतुकास्पद बाब आहे. सामाजिक बांधिलकी जपत प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले आहे. रक्तदान हेच खरे जीवनदान आहे. रक्तदानाच्या महान कार्यात सहभागी होऊन एक चांगला पायंडा जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानने पाडला आहे,असे प्रतिपादन जनकल्याण रक्तकेंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास मढीकर यांनी केले.

जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान (ट्रस्ट) आणि सकल हिंदू स्वकुळ साळी समाजाच्या वतीने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवाचे औचित्य साधून जनकल्याण रक्तपेढी, नालेगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



यावेळी जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण डफळ म्हणाले, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.आपण केलेल्या रक्तदानामुळे एखाद्याचे प्राण वाचू शकतात. भगवान श्री जिव्हेश्वरांच्या जन्मोत्सवानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेले हे शिबिर समाजासाठी प्रेरणादायी आहे.तरुणांनी दाखविलेला उत्साह कौतुकास्पद आहे.

याप्रसंगी किशोर विंचुरकर,राकेश गवते,प्रशांत भंडारे, संजय जठार,प्रदीप दळवी,प्रसाद कांबळे,गणेश ढाणके, वैभव जठार,सुमित ढोकळे, रोहन आकडे,योगेश पांढरपोटे,ओंकार दळवी, गणेश दळवी,शुभम झिंजे, चेतन कांबळे,धनेश्वर पाठक,श्रावण सदाफुले,अमित डाके,जनकल्याण रक्त केंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे,जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर, डॉ.गुलशन गुप्ता, अकाउंट ऑफिसर गजेंद्र सोनवणे,अमित टकले आदी पदाधिकारी व रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैठण परिसरात 'एक गाव, एक गणपती'चा संदेश; डीजेला फाटा देत संस्कारित गणेशोत्सवाचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–**आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी पैठण परिसरातील ग्रामस्थांना शांतता, सामाजिक सलोखा आणि पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. 'एक गाव, एक गणपती' संकल्पना राबवून उत्सवाला सामाजिक आणि विधायक स्वरूप देण्याबरोबरच आरोग्य व पर्यावरणासाठी घातक ठरणाऱ्या डीजेला पूर्णपणे फाटा देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पैठण तालुक्यातील पाटेगाव, चनकवाडी, वडवाळी, नवगाव, आपेगाव, जायकवाडी, कावसान, घारी, दादेगाव यासह परिसरातील अनेक गावांमध्ये गणेशोत्सवाची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर



पोलिसांनी गणेश मंडळे व ग्रामस्थांना कर्णकर्कश डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन देऊन आपली संस्कृती जपण्याचे आवाहन केले आहे. डीजेमुक्त गणेशोत्सवासाठी पोलिसांचा पुढाकार गणेशोत्सवात सामाजिक उपक्रम, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान यांसारखे विधायक उपक्रम राबवून उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता डीजेचा वापर टाळावा, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. 'सुरक्षित उत्सव, स्वच्छ उत्सव, संस्कारित उत्सवहीच आपली जबाबदारी' असा संदेश देत गणेश मंडळांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी केले आहे. आगामी गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि सामाजिक सलोखा जपत पार पाडण्यासाठी पैठण परिसरातील ग्रामस्थांनी प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देण्याची गरज आहे.



# भगवान श्री जिव्हेश्वर जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वकुळसाळी समाजाचे आराध्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या जयंती निमित्त कल्याण रोड येथील संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत चित्रकला स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेत जवळजवळ २७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमासाठी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, खजिनदार गजेंद्र सोनवणे, उत्सव समिती प्रमुख निरज चांगटे,महेश कांबळे,शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना भामरे,स्पर्धा प्रमुख बबनभाई शेख,राजेंद्र गर्जे,सुशीलकुमार आंधळे,चंदा कार्ले,वैशाली केदारे,अनिता जपकर,राणी पवार आदी उपस्थित होते.

यावेळी विक्रम पाठक म्हणाले, चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला



आहे. चित्र काढताना आपण बारकाईने बघायला शिकतो. रंग, आकार, निसर्ग यांचे निरीक्षण वाढते आणि मन एकाग्र होते. चित्रकला आपल्याला कल्पनाशील बनवते. एक कोरा कागद आणि रंगांच्या सहाय्याने आपण नवीन विश्व निर्माण करू शकतो. चित्रकलेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास होतो.

# चारित्र्याच्या संशयातून पत्नीचा खून; निलजगाव रोडवरील महिलेच्या मृत्यूचे गूढ उलगडले

## पती अनिल बोराडे पोलिसांच्या ताब्यात; बिडकीन पोलिसांचा तपास

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** बिडकीन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील निलजगाव रोडलगत शेतात अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत या मृत्यूचे गूढ उकलले असून, चारित्र्याच्या संशयावरून पतीनेच पत्नीचा खून केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या प्रकरणी पती अनिल बोराडे याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सोमवारी (दि. २४) दुपारी डीएमआयसी परिसरातील निलजगाव रोडलगतच्या शेतात ३० ते ३५ वर्षीय अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला होता. घटनेची माहिती मिळताच बिडकीन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा



केला. मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली.

पोलिसांच्या तपासात मृत महिला सोनाली बोराडे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी तिच्या मृत्यूचे कारण व घटनाक्रमाचा शोध घेतला. तपासादरम्यान पती अनिल बोराडे याच्यावर पोलिसांचा संशय बळावला. चारित्र्यावर संशय घेत अनिलने सोनालीचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

या प्रकरणी पद्मा सूर्यभान बनकर यांच्या फिर्यादीवरून बिडकीन पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### नेप्तीत गोसावी बाबांचा भंडारा उत्सव उत्साहात



अहिल्यानगर- नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्री गोसावी बाबांचा सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात येणारा भंडारा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. उत्सवानिमित्त संपूर्ण नेप्ती नगरीत धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. पुंड परिवाराच्या वतीने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक धार्मिक परंपरा जपत पुंड परिवाराने यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले होते अशी माहिती रामदास फुले यांनी दिली. या उत्सवानिमित्त श्री गोसावी बाबांच्या समाधी परिसराची विशेष स्वच्छता करण्यात आली होती. परिसरात शेणाचा सडा टाकून महिलांनी आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. फुलांची आकर्षक सजावट तसेच विद्युत रोषणाईने समाधी परिसर उजळून निघाला होता. त्यामुळे संपूर्ण परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. श्री. सिताराम पुंड व प्राध्यापक भाऊसाहेब सिताराम पुंड यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात श्री गोसावी बाबांना पंचामृत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर नंदनवन उद्योगसमूहाचे संचालक बाबासाहेब जाधव, शिवसेना विधानसभा प्रमुख नगर शहर दत्ता जाधव व सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, माजी सरपंच अंबादास पुंड, विलास चौरे, ग्रामपंचायत सदस्य रामदास पुंड, आसाराम पुंड, प्रा. एकनाथ होले ,प्रा. बबन कांडेकर तसेच वेताळबाबा मित्रमंडळ यांच्या हस्ते श्री गोसावी बाबांची विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी भाविकांनी फुलांची उधळण करत 'गोसावी बाबा की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून सोडला.सायंकाळी गावातील विविध भजनी मंडळांच्या सहभागाने टाळ-मृदंगाच्या गजरात गावातून भव्य दिंडी प्रदक्षिणा काढण्यात आली. दिंडीत महिला, युवकांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भक्तिगीते, अभंग आणि जयघोषाने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. दिंडीनंतर भजनाचा कार्यक्रम पार पडला. यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पुंड परिवाराने महाप्रसादाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केल्याने नेप्तीसह पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने आलेल्या भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण उत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, महिला, युवक तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सागर भिंगारदिवे यांचा 'रिपाइं'मध्ये जाहीर प्रवेश

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले सागर उत्तम भिंगारदिवे यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) मध्ये जाहीर प्रवेश केला. केंद्रीय मंत्री तथा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी रामदास आठवले यांनी भिंगारदिवे यांचे पक्षात स्वागत करून त्यांच्या आगामी सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पक्षप्रवेश झाला.जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी तसेच पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सुनील साळवे सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सागर भिंगारदिवे यांनी सांगितले.पक्षप्रवेशानंतर बोलताना भिंगारदिवे म्हणाले, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) मध्ये प्रवेश हा माझ्यासाठी केवळ राजकीय पक्षबदल नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आणि भारतीय संविधानाच्या मूल्यांना अधिक ताकदीने पुढे नेण्याचा संकल्प आहे.

सीताराम सारडा विद्यालयात राखी बनवा स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## रक्षाबंधन केवळ सण नसून संस्कृतीचा उत्सव - ॲड.अनंत फडणीस



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रक्षाबंधन हा केवळ सण नाही, तर भारतीय संस्कृतीतील बहीण-भावाच्या पवित्र नात्याचा उत्सव आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने बनविलेल्या राखीतून सर्जनशीलता आणि आपुलकी दिसून येते. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीचे संस्कार रुजतात,असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड.अनंत फडणीस यांनी केले.

बागडपट्टी येथील हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात रक्षाबंधनानिमित्त राखी बनवा कार्यशाळा व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून सुबक,आकर्षक व कलात्मक राख्या बनविल्या.यावेळी कार्यक्रमा प्रसंगी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस,कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,भाईसथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ.पारस कोठारी,प्रमुख पाहुणे उद्योजक मोहन मानधना,चेअरमन अजित बोरा,मुख्याध्यापिका सौ.मंगला डोळस,पर्यवेक्षिका सौ.नंदा कानिटकर, शिक्षक प्रतिनिधी विनोद जोशी, सौ.निमा राहिंज, समिती प्रमुख सौ. शितल शिंदे,गणेश नागपुरे आदींसह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व सेवकवृंद उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल -प्रथम क्रमांक -कु. रामकुमारी बनारसी (९ वी),द्वितीय क्रमांक - कु. ज्ञानेश्वरी बेरड (८ वी)तृतीय क्रमांक - कु. लोकेश्वरी परदेशी (७ वी)उत्तेजनार्थ -कु. हर्षाली जाटव,रिबेका कांबळे,संजना उमाप विजेते

विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा यांनी प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थिनींना रोख बक्षीस व उत्तेजनार्थ बक्षीस पात्र विद्यार्थिनींना भेटवस्तू दिल्या.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ.मंगला डोळस यांनी केले. स्वागत वाघ सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शितल शिंदे यांनी केले, तर आभार विनोद जोशी यांनी मानले.

श्रावण सोमवारनिमित्त ३१ रोजी

## पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टतर्फे महाप्रसाद भंडारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रावण महिन्यानिमित्त तिसऱ्या श्रावणी सोमवारच्या पावन पर्वावर भव्य महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, नेप्ती नाका जवळ, अहिल्यानगर येथे हा महाप्रसाद होणार आहे.



श्रावण सोमवारनिमित्त आयोजित या महाप्रसादात यावर्षी पद्मशाली समाजामध्ये प्रसिद्ध असलेला 'पप्पू बुवा शिरा' म्हणजेच वरण, भात आणि शिरा असा पारंपरिक महाप्रसाद ठेवण्यात आला आहे.

या विशेष महाप्रसादाचा लाभ परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांमध्ये सातत्याने योगदान देणाऱ्या ट्रस्टच्या वतीने दरवर्षी श्रावण सोमवारनिमित्त महाप्रसादाचे आयोजन केले जाते. भक्तीबरोबरच सेवाभावाची परंपरा जपण्याच्या उद्देशाने यंदाही हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

महाप्रसादासाठी शिधा, अन्नधान्य अथवा देणगीच्या स्वरूपात सहकार्य करू इच्छिणाऱ्या भाविकांनी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

## अमेरिकेत मराठी लोककला जपणारा असा कार्यक्रम पाहणे ही भाग्याची गोष्ट – वैशाली मोरे

**द फोक आख्यान'चा कार्यक्रम अप्रतिम; वैशाली मोरे यांनी केले कलाकारांचे विशेष कौतुक**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती फाउंडेशनच्या न्यू जर्सी राज्य युवती अध्यक्षा वैशाली मोरे यांनी नुकतीच 'द फोक आख्यान'च्या कलाकारांची भेट घेऊन त्यांच्या अप्रतिम कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले. महाराष्ट्राची समृद्ध लोककला, संस्कृती आणि परंपरा प्रभावीपणे सादर करणाऱ्या या टीमचे त्यांनी छत्रपती फाउंडेशनच्या वतीने अभिनंदन केले.

''अमेरिकेत राहणाऱ्या मराठी नागरिकांना आपल्या मातीतील अस्सल लोककला अनुभवण्याची संधी मिळणे ही अत्यंत आनंदाची आणि भाग्याची गोष्ट आहे. 'द फोक आख्यान'चा कार्यक्रम खरोखरच अप्रतिम आहे. कलाकारांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून महाराष्ट्राची संस्कृती आणि लोकपरंपरा जिवंत केल्या,'' असे वैशाली मोरे यांनी सांगितले.

परदेशात राहूनही महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जपणे आणि तो नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक आहे. 'द फोक आख्यान'च्या टीमने आपल्या दर्जेदार सादरीकरणातून अमेरिकेतील मराठी प्रेक्षकांना मायभूमीशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

आपली लोककला अशाच प्रकारे जपली जावी आणि ती जगभरातील अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी, अशी अपेक्षा वैशाली मोरे यांनी व्यक्त केली. छत्रपती फाउंडेशनच्या वतीने त्यांनी 'द फोक आख्यान'च्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील सांस्कृतिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आनंदऋषीजी नेत्रालय तारकपूर शाखेचा प्रथम वर्धापन दिन

## नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व चष्म्यावर विशेष सवलत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेला एक वर्ष पूर्ण झाले आहे. या प्रथम वर्धापन दिनानिमित्त तारकपूर शाखेत दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत नेत्र तपासणी ओपीडी फीवर ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. याशिवाय चष्म्यावर १० टक्के सवलत दिली जात आहे, अशी माहिती नेत्रालयाचे प्रशासनाधिकारी आनंद छाजेड यांनी दिली.

आनंदऋषीजी नेत्रालयातील उच्च दर्जाच्या नेत्रोपचार सुविधा जास्तीत जास्त रुग्णांना त्यांच्या जवळच्या परिसरात उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने एक वर्षापूर्वी तारकपूर परिसरात नेत्रालयाची शाखा सुरू करण्यात आली. या शाखेला सावेडी उपनगर परिसरातील नेत्ररुग्ण तसेच बाहेरगावाहून तारकपूर बसस्थानकात येणाऱ्या रुग्णांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आधुनिक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि रुग्णाभिमुख सेवा यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होत आहे.

तारकपूर शाखेत मेडिकल सुपरिटेंडंट डॉ. प्रतीक कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांना आवश्यक नेत्रतपासणी, निदान व उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांची टीम येथे कार्यरत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नेत्र तपासणी व उपचार केले जातात.

प्रथम वर्धापन दिनानिमित्त नेत्र तपासणी व शस्त्रक्रियांवर विशेष सवलती देण्यात येत आहेत. ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेवर १० टक्के सवलत दिली जात आहे. तसेच ज्या रुग्णांनी आनंदऋषीजी नेत्रालयात पहिल्या डोळ्याची शस्त्रक्रिया केली आहे, त्यांना लेसर मोतीबिंदू शस्त्रक्रियेवर २० टक्के सवलत मिळणार आहे. प्रोग्रेसिव्ह चष्म्यांच्या दुसऱ्या जोडीसाठी प्रोग्रेसिव्ह ग्लासेसच्या खरेदीवर २० टक्के सवलत देण्यात येत आहे.

पारदर्शकता, गुणवत्तापूर्ण उपचार आणि वचनबद्ध रुग्णसेवा हे आनंदऋषीजी नेत्रालयाचे वैशिष्ट्य आहे. तारकपूर शाखेत डोळ्यांच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेण्यासाठी आवश्यक आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नेत्ररुग्णांनी प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित या विशेष सवलत योजनेचा लाभ घेऊन आपल्या डोळ्यांची तपासणी करून घ्यावी आणि निरोगी व निर्दोष दृष्टीचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ८६८६३०१५१५

## जवानांना राखी बांधून विद्यार्थिनींचा देशसेवेला सलाम

**रक्षाबंधनानिमित्त ''स्नेहबंधचा आर्मड स्टॅटिक वर्कशॉपमध्ये उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि स्नेहाचा धागा अधिक घट्ट करणाऱ्या रक्षाबंधन सणाला देशसेवेची भावनिक किनार लाभली. पी.एम. श्री. डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद शाळेतील विद्यार्थिनींनी आर्मड स्टॅटिक वर्कशॉप, अहिल्यानगर मधील जवानांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. सीमेवर तसेच देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थिनींनी त्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

केवळ सण साजरा न करता त्यामागील भावनेला सामाजिक आणि राष्ट्रीय मूल्यांची जोड देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठीही भावनिक ठरला. यावेळी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, आर्मड स्टॅटिक वर्कशॉपचे कमांडट मनराज सिंग, लेफ्टनंट कर्नल विमल चंद, लेफ्टनंट कर्नल नरेंद्र हळदणकर, सुभेदार मेजर सौरभ चंद्रसिंग उपस्थित होते. तसेच पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद शाळेच्या शिक्षिका स्नेहल लवांडे, सायली लेंडे आदी उपस्थित होते.

जवानांचे आयुष्य म्हणजे कर्तव्य, शिस्त आणि देशसेवेचा ध्यास. कुटुंबापासून दूर राहून देशाच्या सुरक्षेसाठी योगदान देणाऱ्या जवानांना रक्षाबंधनाच्या दिवशी विद्यार्थिनींनी दिलेला हा प्रेमाचा धागा विशेष ठरला. राखीच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी जवानांच्या त्यागाला आणि देशसेवेला सलाम केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि कृतज्ञतेची भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला. रक्षाबंधन निमित्त विद्यार्थिनी आणि जवान यांच्यात निर्माण झालेला हा स्नेहाचा धागा केवळ राखीपुरता मर्यादित न राहता देशप्रेम आणि कृतज्ञतेचा संदेश देणारा ठरला. जवानांच्या मनगटावर बांधलेली राखी आणि विद्यार्थिनींच्या मनातील आदरभाव यामुळे आर्मड स्टॅटिक वर्कशॉप मधील रक्षाबंधनाचा सोहळा अविस्मरणीय ठरला.

## मदर टेरेसांच्या मानवसेवेच्या वाटेवर चालणाऱ्या बुथ हॉस्पिटलमधील डॉक्टर–परिचारिकांचा सन्मान

**जन्मदिनानिमित्त शाहू-फुले-आंबेडकर-साठे-कलाम सामाजिक विचार मंच व उषा सामाजिक संस्थेचा उपक्रम; 'माणसाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा' – सुनिल सकट**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गरजू, दुःखी आणि आजारी व्यक्तींच्या सेवेसाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित करणाऱ्या संत मदर टेरेसा यांच्या जन्मदिनानिमित्त बुथ हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे रुग्णांची अहोरात्र सेवा करणाऱ्या डॉक्टर, रुग्णसेविका आणि परिचारिकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. रुग्णसेवेच्या माध्यमातून मानवतेची सेवा करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शाहू-फुले-आंबेडकर-साठे-कलाम सामाजिक विचार मंच आणि उषा सामाजिक संस्थेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

कोरोना महामारीच्या काळात बुथ हॉस्पिटलने रुग्णसेवेत महत्त्वपूर्ण योगदान देत अनेक रुग्णांना उपचार देऊन जीवदान देण्याचे कार्य केले. या रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविका निःस्वार्थ भावनेने रुग्णांची सेवा करीत आहेत. त्यांच्या या समर्पित कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने मदर टेरेसा यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून हा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. मदर टेरेसा यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील गरजू, दुःखी, निराधार आणि आजारी व्यक्तींच्या सेवेसाठी वाहून घेतले. त्यांच्या मानवतावादी कार्यातून प्रेरणा घेत रुग्णांची सेवा करणाऱ्या डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक शिंदे म्हणाले की, रुग्णांची सेवा ही केवळ नोकरी किंवा कर्तव्य नसून ती मानवतेची सेवा आहे. एखाद्या गरजू व्यक्तीच्या वेदना कमी करण्यासाठी आपण सातत्याने काम केले, तर त्यातून खऱ्या अर्थाने मानवसेवा घडते. सेवा सातत्यपूर्ण आणि निःस्वार्थ भावनेने केली, तर त्यातच जीवनाचे खरे समाधान मिळते आणि देवाची सेवा केल्याचे पुण्यही प्राप्त होते. मदर टेरेसा यांनी संपूर्ण जगाला मानवसेवेचा हाच मार्ग दाखवून दिल्याचे त्यांनी सांगितले.

कोरोना महामारीच्या काळात आरोग्य क्षेत्रासमोर अभूतपूर्व आव्हान निर्माण झाले होते. अशा कठीण परिस्थितीत बुथ हॉस्पिटलमधील डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविकांनी रुग्णांच्या सेवेसाठी अहोरात्र योगदान दिले. स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता रुग्णांची काळजी घेणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या या सेवाभावाचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना केवळ वैद्यकीय उपचारच नव्हे, तर मानसिक आधार आणि आपुलकीची वागणूक देणेही महत्त्वाचे असते. या दृष्टिकोनातून बुथ हॉस्पिटलमधील कर्मचारी सातत्याने काम करीत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहिर डॉ. अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त समाजसेवक डॉ. सुनील सकट यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. त्यांनी 'माणसाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा' असल्याचे स्पष्ट केले. बुथ हॉस्पिटलमधील डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविकांच्या कार्याचे कौतुक केले. रुग्णांच्या सेवेत कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या सेवाभावाला शुभेच्छा देत मानवसेवेचे हे कार्य असेच सुरू राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या उपक्रमातून रुग्णसेवकांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच समाजात मानवतेचा संदेश देण्यात आला. आजारपण, वेदना आणि संकटाच्या काळात रुग्णांच्या पाठीशी उभे राहणारे डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविका हे आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या समर्पित सेवेला सलाम म्हणून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी बुथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर सुरेश चोपडे, सहाय्यक प्रशासक मेजर हेलन चोपडे, डॉक्टर शितल शिंदे, मेजर बाबासाहेब थोरात, मेजर भारती थोरात, परिचारिका मुख्याध्यापिका मलिका साबळे, सोनिया थोरात, निकिता केदारी, अमोल देशमुख, सुनीता पारखे, समाजसेवक अमित पठारे, निर्मला वाघमारे, वैद्यकीय सोशल प्रवीण साबळे आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगर जिल्हा वरिष्ठ महिला फुटबॉल संघाने पटकाविले उपविजेतेपद

**जळगाव येथील वरिष्ठ महिला आंतरजिल्हा फुटबॉल राज्य अजिंक्यपद स्पर्धेत दमदार प्रदर्शन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जळगाव येथे पार पडलेल्या वरिष्ठ महिला आंतरजिल्हा फुटबॉल राज्य अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेच्या () अहिल्यानगर जिल्हा वरिष्ठ महिला संघाने शानदार आणि संघर्षपूर्ण कामगिरी करत उपविजेतेपद ( -) पटकावले. मागील वर्षीही द्वितीय उपविजेतेपद मिळवलेल्या अहिल्यानगर संघाने यंदाही आपली सातत्यपूर्ण कामगिरी कायम ठेवत जिल्ह्याच्या महिला फुटबॉलची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली.

नुकतेच झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात अहिल्यानगर जिल्हा संघाने वर्धा जिल्हा संघाचा १२-१ गोलफरकाने धुव्वा उडवत दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला. या सामन्यात सुमय्या शेखने तब्बल ७ गोल, तनिषा शिरसुळने ४ गोल, तर निकिता रामावतने १ गोल करत संघाच्या मोठ्या विजयात मोलाचा वाटा उचलला. सुमय्या शेखच्या शानदार सात गोलांच्या कामगिरीने सामन्यात विशेष लक्ष वेधून घेतले.

उपांत्य फेरीत अहिल्यानगरचा सामना बलाढ्य मुंबई जिल्हा संघाशी झाला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यात अहिल्यानगर संघाला ०-१ असा निसटता पराभव स्वीकारावा लागला. अहिल्यानगरच्या खेळाडूंनी संपूर्ण सामन्यात विजयासाठी शर्थीचे प्रयत्न केले. संघाने शेवटपर्यंत झुंज देत सामना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न केला; मात्र एका गोलच्या फरकाने विजय हुकला. या पराभवानंतरही संघाची जिद्द आणि लढाऊ वृत्ती कायम राहिली.

तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात अहिल्यानगर जिल्हा संघासमोर ठाणे जिल्हा संघाचे आव्हान होते. निर्धारित वेळेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक गोल केल्याने सामना १-१ असा बरोबरीत राहिला. अहिल्यानगरकडून सुमय्या शेखने सुरुवातीलाच गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. मात्र ठाणे संघाने दमदार पुनरागमन करत बरोबरीचा गोल केला आणि सामना टाय-ब्रेकरमध्ये गेला. टाय-ब्रेकरमध्ये अहिल्यानगर संघासमोर मोठे आव्हान उभे राहिले. संघाच्या गोलरक्षकाला दुखापत झाल्यामुळे सुमय्या शेखने गोलरक्षकाची जबाबदारी स्वीकारली. मैदानावरील आपल्या आक्रमक भूमिकेतून थेट गोलरक्षकाची भूमिका स्वीकारत तिने अप्रतिम कामगिरी केली आणि सलग तीन पेनल्टी वाचवत संघाला विजयाच्या दिशेने नेले.

अहिल्यानगरकडून तनिषा शिरसुळ, राणी कदम आणि सुमय्या शेख यांनी टाय-ब्रेकरमध्ये पेनल्टी गोल करत संघाला ३-१ असा विजय मिळवून दिला. या रोमांचक विजयासह अहिल्यानगर जिल्हा संघाने स्पर्धेतील द्वितीय उपविजेतेपद निश्चित केले.

अहिल्यानगर जिल्हा संघाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद व अमरजीत सिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, कोषाध्यक्ष रिशपाल सिंग परमार, सहायक कोषाध्यक्ष रणबीरसिंग परमार तसेच सर्व समिती सदस्य यांनी संघाचे अभिनंदन केले.

संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक प्रसाद पाटोळे आणि संघ व्यवस्थापक प्रियंका सूर्यवंशी आणि सपोर्ट स्टाफ यांनी दाखवलेली शिस्त, संघभावना, जिद्द आणि प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानण्याची वृत्ती कौतुकास्पद असल्याचे पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. विशेषतः ठाणेविरुद्धच्या सामन्यात

# अहिल्यानगर येथे जेके सुपर सिमेंट तर्फे 'टेक कनेक्ट' कार्यक्रम उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जेके सुपर सिमेंटच्या वतीने अहिल्यानगर येथे 'टेक कनेक्ट' कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शहर व परिसरातील इंजिनियर, आर्किटेक्ट, यांच्यासोबत तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण तसेच कंपनीच्या विविध उपक्रमांची माहिती देणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन प्रतिनिधी इंजि.यश शहा, बाळासाहेब शिंदे, रोहित चव्हाण जे के सिमेंट चे जयसिंग कदम, अखिलेश नितनवरे, विकास ठाकूर, श्रीकांत थोरात, तसेच जे के सिमेंट चे डीलर, आदित्य ट्रेडर्स,कालिका सेल्स, सुजित ट्रेडर्स, साई ट्रेडर्स यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अहिल्यानगर परिसरातील अनेक इंजिनिअर्स ,आर्किटेक्ट तसेच जेके सिमेंटचे अधिकारी आणि कंपनीचे सन्माननीय चॅनेल पार्टनर उपस्थित होते. कार्यक्रमात जेके सिमेंटचे पुणे सेल्स श्री. जयसिंग कदम, पुणे श्री. अखिलेश नितनवरे आणि श्री. विकास ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्री. जयसिंग कदम यांनी उपस्थित इंजिनिअर्स ,आर्किटेक्ट यांचे स्वागत करून जेके सिमेंटच्या कार्यपद्धती, उद्दिष्टे आणि भविष्यातील दृष्टिकोनाबाबत मार्गदर्शन केले. तसेच श्री. अखिलेश नितनवरे यांनी , आणि याबाबत सविस्तर तांत्रिक माहिती दिली. कार्यक्रमाच्या माध्यमातून बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञान, दर्जेदार बांधकाम साहित्य आणि जेके सिमेंटच्या तांत्रिक सेवांबाबत उपयुक्त माहिती मिळाली. उपस्थित इंजिनिअर्स ,आर्किटेक्ट यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध तांत्रिक विषयांवर संवाद साधला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विकास ठाकूर, श्रीकांत थोरात, अविनाश नाईकवाडे, विवेक पाटील, सुरेश डोखे आणि सुरज मुंडे यांनी विशेष सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. जयसिंग कदम यांनी उपस्थित सर्व , इंजिनिअर्स आणि आर्किटेक्ट यांचे आभार मानले. तांत्रिक ज्ञान, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि मजबूत व्यावसायिक संबंध निर्माण करण्याच्या उद्देशाने जेके सुपर सिमेंटच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.



मुकुंदनगर चा रस्ता बोलत आहे...'' माझं काय चुकलं..? प्रशासनाची गुणवत्ता,(?)जनतेची सहनशीलता यातच माझं सुख आणि दुःख...! (छाया - रफिक मुनशी)

**सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत एम. कुलकर्णी सरांचा सेवापूर्ती सदिच्छा सोहळा दिमाखात संपन्न**

# 'प्रसिद्धीपेक्षा विद्यार्थी सिद्धीसाठी राबणारे शिक्षक म्हणजे एल. एम. कुलकर्णी सर' - ॲड. किशोरजी देशपांडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक माननीय श्री. लक्ष्मीकांत मधुकर (एल. एम.) कुलकर्णी यांच्या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ ज्ञानसेवेच्या सेवापूर्ती निमित्त सदिच्छा सोहळा दिमाखात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे चेअरमन माननीय ॲड. श्री. किशोरजी देशपांडे उपस्थित होते.

वाद्यांच्या गजरात व पुष्पवर्षावात कार्यक्रमाच्या उत्सवमूर्ती श्री. एल. एम. कुलकर्णी यांचे प्रशालेत आगमन झाले. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी यांनी प्रास्ताविकातून कुलकर्णी सरांच्या मितभाषी स्वभावाचा, सकारात्मक वृत्तीचा, उत्तम नियोजनाचा, कार्यकुशलतेचा आणि हसतमुख, अजातशत्रू व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. तसेच त्यांच्या भावी आयुष्यासाठी उदंड आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. श्री. किशोरजी देशपांडे यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये श्री. एल. एम. कुलकर्णी यांचे अनमोल योगदान असल्याचे सांगितले. कामावरील त्यांची निष्ठा आणि त्यांच्यातील विविध गुण-कौशल्यांचे वर्णन करताना ते म्हणाले, ''स्वतःच्या प्रसिद्धीपेक्षा कुलकर्णी सरांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानसिद्धीसाठी प्रयत्न केले. कित्येक कार्यक्रमांची आखणी करताना त्यांचा खंबीरपणा जाणवला. प्रसिद्धीपेक्षा विद्यार्थी सिद्धीसाठी राबणारे शिक्षक म्हणून त्यांचे कार्य कायम स्मरणात राहील.'' यावेळी त्यांनी कुलकर्णी सरांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी श्री. एल. एम. कुलकर्णी यांना संस्थेच्या वतीने मानपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. मानपत्राचे वाचन प्रशालेच्या शिक्षिका सौ. स्वप्ना कलवडे यांनी केले. श्री समर्थ विद्यामंदिर, सावेडी व सांगळे गल्ली येथील दोन्ही विभागांतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी श्री. एल. एम. कुलकर्णी यांचा भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

प्रशालेत ३२ वर्षांची प्रदीर्घ ज्ञानसेवा देताना श्री. एल. एम. कुलकर्णी यांनी प्रशालेचा शैक्षणिक व सांस्कृतिक आलेख सातत्याने चढता ठेवला असून, प्रशालेच्या गुणवत्तेमध्ये मोलाची भर टाकली. त्यांच्या कार्याबद्दल प्रशालेतील सहकारी शिक्षकांनी आपल्या मनोगतातून कृतज्ञता व भावना व्यक्त केल्या. प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक श्री. राशीनकर, सौ. शास्त्री व श्री. बागुल यांनी कुलकर्णी सरांसोबतच्या आठवणी सांगताना शाळेच्या जडणघडणीत त्यांनी झोकून देऊन केलेले काम कायम स्मरणात राहील, असे सांगत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला.

प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री. कासार सर, माजी शिक्षक श्री. बापूसाहेब गायकवाड, श्री. सातपुते सर, सरांच्या भगिनी सौ. संगिता मालपाठक, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, श्री समर्थ विद्यालय, सांगळे गल्लीचे मुख्याध्यापक श्री. सुनील कानडे, प्रा. श्री. अवचट सर यांनीही आपल्या मनोगतातून कुलकर्णी सरांसोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

संस्थेचे सेक्रेटरी माननीय श्री. सुरेश क्षीरसागर यांनीही प्रशालेच्या वर्धिष्णू वाटचालीत कुलकर्णी सरांचा असलेला सक्रिय सहभाग आणि त्यांची समर्पित सेवाभावी वृत्ती याबद्दल आपले मत व्यक्त केले. भावी काळात त्यांनी निरामय व आनंदी आयुष्य जगावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

कुलकर्णी सरांच्या सुविद्य पत्नी सौ. शीतल कुलकर्णी यांनी सर्वांच्या उपस्थितीबद्दल आभार मानताना सरांनी कुटुंब आणि नोकरी या दोन्ही ठिकाणी योग्य न्याय दिला असल्याचे सांगितले.

# मुंबई, पुणेच्या धर्तीवर अत्याधुनिक पद्धतीने मिळणारी रुग्णसेवा कौतुकास्पद - सुवालाल बोथरा

**आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या महा आरोग्य शिबिराच्या माध्यमातून ५८०० रुग्णांची तपासणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून निस्वार्थपणे व सेवाभावी वृत्तीने रुग्णसेवेचे कार्य केले जात आहे.या शिबिराच्या माध्यमातून सेवा करण्याची संधी बोथरा परिवाराला दिली आहे.राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांचा कृपा आशीर्वाद रुग्णांना मिळत असल्याने हजारो रुग्णांचे प्राण आजपर्यंत वाचले आहेत.येथील सर्व डॉक्टर्स,नर्सेस व कर्मचारी अत्यंत तळमळीने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत. अहिल्यानगर च्या रुग्णांना पूर्वी मुंबई, पुणे येथे उपचारासाठी रुग्णांना जावे लागत होते.आत्याधुनिक व प्रगतशील तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उपचार पद्धतीमुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. मुंबई,पुणे च्या धर्तीवर अत्याधुनिक पद्धतीने मिळणारी रुग्णसेवा कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन उद्योजक सुवालाल बोथरा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त स्वर्गीय सौ वैशाली सुबोध बोथरा यांच्या स्मरणार्थ

बोथरा ग्रुप व बोथरा परिवार यांच्या वतीने प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन सुवालाल बोथरा,विनोद बोथरा,प्रमोद बोथरा,प्रकाश बोथरा,सुबोध बोथरा यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी गौतम चोरडिया,सौ. कल्पना चोरडिया,कुमारी आकांक्षा चोरडिया,मोहक बोथरा, सौ.कविता बोथरा,सौ.संगिता बोथरा,कल्पना बोथरा,नित्या बोथरा,रविना बोथरा,सौ.सेजल बोथरा,सौ.महिमा बोथरा, सौ.सेजेल श्रेयस बोथरा, सौ.साक्षी बोथरा,अक्षय भंडारी,जैन सोशल फेडरेशनचे सदस्य डॉ.वसंत कटारिया,संतोष बोथरा, अभय गुगळे, माणकचंद कटारिया,सतीश लोढा, डॉ. आशिष भंडारी,सुभाष मुनोत,वसंत चोपडा, शिबिराचे तज्ज्ञ डॉक्टर-डॉ आदीत्य दमानी,डॉ.मृदुला मूळे आदी उपस्थित होते.

मोहक बोथरा म्हणाले,सर्वच आजारांवर प्रामुख्याने आरोग्य शिबिरे भरविले जातात.परंतु प्लास्टिक सर्जरी यासारख्या महागड्या उपचार पद्धती असणाऱ्या आजारावर आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आरोग्य शिबिर घेतले जाते.ही कौतुकास्पद बाब आहे. चेहऱ्यावरील व्रण त्वचेवरील जखमा बरे करण्यासाठी प्लास्टिक सर्जरी सारखे उपाय करावे लागतात.परंतु महागडे उपचार पद्धतीमुळे अनेक रुग्ण प्लास्टिक सर्जरी करण्यापासून वंचित राहतात. या शिबिराच्या माध्यमातून अनेक रुग्णांना दिलासा मिळेल.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,सुवालाल बोथरा व बोथरा परिवार यांच्या सदभावनेने व सह्योगाने प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.आनंदऋषीजी म.सा.यांचे स्वप्न साकारण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोठ्या प्रमाणात शिबिरे भरविले जातात.चाळीस वर्षांपूर्वी आरोग्य शिबिरे घेण्यात आली होती. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातूनच आनंदऋषीजी हॉस्पिटलची निर्मिती झाली आहे.ऑगस्ट महिन्यातील १६ आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून पाच हजार आठशे रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह पाच सहा जिल्ह्यातील रुग्ण मोठ्या विश्वासाने व आत्मीयतेने येथे उपचार घेण्यासाठी येत आहेत.रुग्णांच्या आशीर्वादानेच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात मोठे यश मिळत आहे.समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने वर्धमान महावीर युनिव्हर्सिटी, नेत्रालय विभाग,बीड,तारकपूर येथील ओपीडी, तसेच वर्धमान महावीर स्कूल,नर्सिंग कॉलेज असे विविध सेवा प्रकल्प सुरू आहेत. शिबिराच्या माध्यमातून सामाजिक कार्य करण्यासाठी मोठी ऊर्जा मिळत आहे.

डॉ.मृदुला मूळे म्हणाले,स्माईल ट्रेन प्रोजेक्ट सुरू करणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल हे अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिलेच सेंटर आहे.स्माईल ट्रेन ही जगभरातील एक अशी संस्था आहे की,या संस्थेमार्फत अनेक शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात.या प्रोजेक्ट अंतर्गत दुभागलेले ओठ,फाटलेले ओठ तसेच टाळू याविषयी च्या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केल्या जातात.या शिबिराचे असे वैशिष्ट्य आहे की,या शिबिरात येणाऱ्या रुग्णांचे दुभंगलेले ओठ,फाटलेले ओठ व टाळू या शस्त्रक्रिया वर्षभर मोफत केल्या जातील.प्लास्टिक सर्जरी शिबिरात लहान मुलांचे जन्मजात हातांच्या समस्या,व्यंग,मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा,हातांच्या नसासंबंधीत आजार,चेहऱ्यावरील व्रण आणि लाल ग्रंथी समस्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार पांढरे चट्टे,तोंडाचे व्रण यावर औषध उपचार करण्यात येत आहे.या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा. या शिबिरात ८० रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले.तर आभार सतीश लोढा यांनी मानले.

# स्वच्छता दूतांच्या हाती आर्य चाणक्यची सन्मानाची राखी; सेवाभावी कर्मचाऱ्यांचा गौरव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधून आर्य चाणक्य विद्यामंदिर येथे शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र सेवा बजावणाऱ्या स्वच्छता दूतांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वच्छता दूतांना राखी बांधून त्यांच्या सेवेला सलाम केला. सामाजिक बांधिलकी आणि कृतज्ञतेचा संदेश देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मकुमार कासलीवाल होते. संस्थेचे कार्यवाहक जुगलकिशोर लोहिया, अतिथी मदन ज्योतिक यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे मार्गदर्शन श्रीमती रूपाली बोर्डे यांनी केले.

यावेळी स्वच्छता दूतांचा परिचय करून देताना मनोज शिंगारे यांनी वाल्मीकी समाजाच्या सेवाभावी कार्याचा गौरव केला. स्वच्छता दूत शहराच्या स्वच्छतेसोबत नागरिकांच्या आरोग्याचीही महत्त्वाची जबाबदारी निष्ठेने पार पाडत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या कार्यातून मातृत्वातील माया आणि कर्तृत्वातील जिद्दीचा सुरेख संगम दिसून येतो. पैठण शहराच्या स्वच्छतेसाठी त्यांचे योगदान अमूल्य असून, त्यांच्या सेवेला शब्दांत पूर्णपणे व्यक्त करणे शक्य नसल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी श्रीमती गीता राजेंद्र तुसामकर, श्रीमती विमलबाई रमेश चंडाळे, मनोज डुलगज, सागर डुलगज आणि राजेश चंडाळे यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त केली. केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी स्वच्छता दूतांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. समाजाचे आरोग्य आणि शहराची स्वच्छता अबाधित ठेवण्यासाठी प्रत्यक्ष मैदानात कार्य करणाऱ्या या सेवकांचा सन्मान करणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती कविता राऊत यांनी केले, तर श्रीमती मिनाक्षी पिंपळे यांनी आभार मानले.

# पुण्यात तीन बांगलादेशी ताब्यात!

**विशेष शाखा आणि मिलिटरी इंटेलिजन्सची संयुक्त मोहीम; बेकायदेशीर वास्तव्यासंदर्भात चौकशी**

**पुणे–** पुणे शहरात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असल्याच्या संशयावरून विशेष शाखा (), पुणे आणि मिलिटरी इंटेलिजन्स (), पुणे यांच्या संयुक्त पथकाने कारवाई करत तीन बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजता ही कारवाई करण्यात आली. लष्करी गुप्तचर यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. या कारवाईत सोनिया अख्तर, मोतियार गाजी आणि सोनिया मोती पान या तिघांना ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त आहे.

ताब्यात घेतलेल्या तिघांची प्राथमिक चौकशी आणि कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, त्यांच्या भारतातील प्रवेश व वास्तव्याबाबत आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान, तिन्ही जणांविरुद्ध स्थानबद्धता () आदेशाची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यांना बांगलादेशात परत पाठविण्याची कार्यवाही केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

या कारवाईनंतर पुणे शहरातील संवेदनशील भागांमध्ये गुप्तचर यंत्रणा आणि पोलिसांकडून निगराणी अधिक कडक करण्यात आली आहे. वैध कागदपत्रांशिवाय वास्तव्यास असलेल्या व्यक्ती तसेच अशा प्रकारच्या नेटवर्कचा शोध घेण्यासाठी तपास आणि पडताळणी मोहीम सुरू असल्याचे समजते.

(पान १ वरुन)

## कुणबी प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेत सुसूत्रता आणा - ना. विखे पाटील

जात वैधता प्रमाणपत्राची कार्यवाही सुलभ करण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. बैठकीत विविध प्रकरणांच्या कार्यवाहीचाही आढावा घेण्यात आला. जुन्या अभिलेखांतील नोंदी, त्यांचे भाषांतर तसेच उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे वंशावळ निश्चित करण्याच्या प्रक्रियेबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दिली. आवश्यकतेनुसार मूळ अभिलेख मागवून त्याची पडताळणी करून तसेच तज्ज्ञांकडून भाषांतराची खातरजमा करून नियमानुसार प्रकरणांचा निर्णय घेण्यात येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेची स्पष्ट माहिती तसेच आवश्यक कागदपत्रांची यादी सहज उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही डॉ. विखे पाटील यांनी दिल्या.

## सोशल मीडियावर महिलेची बदनामी करून उकळली पाच लाखांची खंडणी

दरम्यान, आरोपी किशोर परभणे याने चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद पवार यांच्याविरोधात गंभीर आरोप केले होते. सरपंच शरद पवार यांनी आपले अपहरण करून डांबून ठेवले व मारहाण केली, अशी तक्रार परभणे याने पोलीस ठाण्यात दिली होती. आता पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून काळेवाडी पोलिसांनी किशोर परभणेविरुद्ध खंडणी, विनयभंग, धमकी व माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे.

## ८३४ विद्यार्थ्यांच्या हातून साकारल्या हजारो 'समर्थ राख्या'; जवानांच्या मनगटासाठी देशभक्तीचा प्रेमधागा!

व बटणे अशा टाकाऊ वस्तूंना कल्पकतेने नवे रूप देत 'टाकाऊपासून टिकाऊ' या संकल्पनेला देशभक्तीची जोड देण्यात आली. प्रत्येक राखीत जवानांसाठी प्रेम आणि शुभेच्छांचा संदेश गुंफण्यात आला.

भारत माता की जय', 'वंदे मातरम', 'जय जवान, जय किसान...' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी टपाल विभागाचे पोस्टमन अक्षय अजबे, हरीश गांगुर्डे, भाऊराव शेलार, सार्थक वेताळ, बाळासाहेब गाडे यांच्याकडे राख्या सुपूर्द केल्या.

पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी सांगितले की, ''सैनिकांसाठी राखी तयार करणे म्हणजे केवळ एक कलाकृती तयार करणे नाही; तर विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम, सामाजिक बांधिलकी, कृतज्ञता आणि राष्ट्रीय एकात्मतेची बीजे रुजविणे आहे. या राख्यांमधून सैनिकांप्रती असलेला आदर आणि बंधुभाव अधिक दृढ झाला आहे.''यावेळी सर्व शिक्षक उपस्थित होते. कलाशिक्षक विवेक भारताल व कु. स्वाती घुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.अमोल बागुल यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले, तर अरुण राशिनकर यांनी आभार मानले.